# सरदार वल्लभभाई पटेल नगर
# रहिवासी वेल्फेअर असोसिएशन

नोंदणी क्र. महाराष्ट्र राज्य / मुंबई/ ११६६/ २०१२ जी.बी.बी.एस.डी.

दि. ०१.०८.२०१३

प्रती,
मा. श्री. सीतारामजी कुंटे
आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका,
मुंबई.

म. न. पा. आयुक्तांचे कार्यालय

**विषय - बृहन्मुंबई महानगरपालिकांतर्गत येणाऱ्या रस्त्यांच्या दूर्दशांबाबत निवेदन.**

महोदय,

उपरोक्त विषयांस अनूसरुन सदरहू निवेदन आपल्या दप्तरी दाखल करीत आहोत. बृहन्मुंबई महानगरपालिका संपूर्ण भारतवर्षातील अग्रगण्य महानगरपालिका म्हणून प्रख्यात आहे. वार्षिक २७ हजार कोटी रुपयांचे अंदाजपत्रक आणि सर्वात जास्त महसूली उत्पन्न व कर केंद्राला देणारी महानगरपालिका आहे. असा हया भारतवर्षाच्या आर्थिक सत्ताकेंद्राच्या माध्यमातून जगाला होत असलेली "खडयांची चंद्रनगरी" म्हणून ओळख नक्कीच भूषणावह नाही.

आज संपर्ण मुंबई मध्ये ६० % पेक्षा जास्त रस्त्ये अतीशय वाईट परिस्थितीमध्ये आहेत. आता त्यामध्ये एम.एम.आर.डी.ए. च्या ताब्यातील, महानरगपालिकेच्या ताब्यातील आणि राष्ट्रीय माहमार्ग प्राधिकरणाच्या ताब्यातील रस्त्ये, हया वर्गवारीवर भाष्य करणे तूर्तास थांबवून हया रस्त्यांच्या सद्यपरिस्थितीस कोणास जबाबदार ठरवावे हा मोठा प्रश्न आज आहे. दर पावसाळयात उखडणारे रस्त्ये, त्याच त्याच कत्रांटदारांची मक्तेदारी आणि प्रशासनाची हया मंडळींवर असणारी पकड हया विषयी, प्रशासनाने प्रमुख म्हणून आपली भूमिका नक्कीच महत्वाची आहे. आपली एकूण कारकिर्द पाहता, मुंबईच्या सूजाण करदारांच्या आपल्याकडून फार अपेक्षा आहेत. निव्वळ राज्यकर्त्यांवर, कंत्राटदारांवर हया गोष्टींची जबाबदारी टाकूण चालणार नाही, त्याहीपेक्षा हया सर्व प्रक्रियेची अंमलबजावणी करणाऱ्या प्रशासनाने हया प्रश्नाकडे गांभिर्याने पाहणे तीतकेच महत्वाचे आहे.

अमेरीकेचे उप-राष्ट्राध्यक्ष श्री. बोडेन हयांच्या क्षणीक प्रवासासाठी जर प्रशासन रात्रीचा दिवस करत असेल तर तीच तत्परता सामान्य करदात्या मुंबईकरांसाठी का नाही ? हा महत्वाचा प्रश्न आहे. सामान्य मुंबईकरांना किती दिवस गृहित धरणार आहोत? हे एकदा किमान प्रशासनाने ठरविण्याची वेळ आता आली आहे आणि सर्वात महत्वाचे म्हणजे हया खराब रस्त्यांमुळे झालेल्या सामान्य नागरिकांच्या मृत्यूस कोणास कारणीभूत धरावे?

तरी प्रशासनाचे प्रमुख आपण या समस्येकडे आणखी सकारात्मकरित्या पाहून किमान पूढील वर्षापासून मुंबईकरांचा वाहन प्रवास सुसहय होईल याबाबत करावाई कारावी.

कळावे,

आपले विश्वासू
सरदार वल्लभभाई पटेल नगर रहीवासी वेल्फेअर असोसिएशन.

अध्यक्ष | सचिव | खजिनदार

संकेतस्थळ - www.svpnrwa.in

प्लॉट नं.७८/बी-१४, ब.अं.साथी.स.गृ.सं.म. सरदार पटेल नगर (म्हाडा), वर्सोवा, अंधेरी (प), मुंबई ४०० ०५३.

Scanned with CamScanner